**प्रेसनोट** **दिनांक २६/०३/२०२५**

**“लोकसेवक श्री. राजेश चंद्रकांत मोरे, वायरमन (बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार) म.रा.वि.वि.कं.मर्या. पालघर शाखा, पालघर विभाग यांना यशस्वी सापळा कारवाई करून गुन्हा दाखल केलेबाबत”**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर |
| **पोलीस ठाणे** | पालघर पोलीस ठाणे जि.पालघर |
| **गु.र.क्र. व कलम** | १००/२०२५<br>भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ सुधारीत २०१८ चे कलम ७ अन्वये |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | श्री. राजेश चंद्रकांत मोरे, वायरमन (बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार) म.रा.वि.वि.कं.मर्या. पालघर शाखा, पालघर विभाग<br>रा. मानपाडा, श्रीकृष्ण मंदिराजवळ, पो. खारेकुरण, ता. जि.पालघर |
| **आरोपी अटक** | श्री. राजेश चंद्रकांत मोरे, वायरमन (बाहयस्त्रोत कंत्राटी कामगार) म.रा.वि.वि.कं.मर्या. पालघर शाखा, पालघर विभाग |
| **मागितलेल्या लाचेची रक्कम** | ३०,०००/— रू. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | ३०,०००/— रू. |

**थोडक्यात हकीगतः—** तक्रारदार यांचा विकास नगर, खारेकुरण, ता. जि. पालघर येथे कोलंबी प्रकल्प असुन सदर कोलंबी प्रकल्पाकरीता तक्रारदार यांनी म.रा.वि.वि.कं. विज जोडणी घेतलेली आहे. सदर प्रकल्पाकरीता आवश्यकतेपेक्षा कमी विजेचे व्हॉलटेज मिळत असल्याने दि. ११/०३/२०२५ रोजी सदर ठिकाणी गावाकरीता नव्याने १०० KVA व्हॉलटेज क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले आहे. नव्याने बसविण्यात आलेल्या ट्रान्सफॉर्मरमुळे तक्रारदार यांचा फायदा होणार असल्याने त्याचे मोबदल्यात यातील आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे रू. ३०,०००/— लाचेची रक्कमेची मागणी केली व सदर रक्कम न दिल्यास ट्रान्सफॉर्मर वरील व्हॉलटेज इतरत्र फिरवुन तक्रारदार यांच्या कोलंबी प्रकल्पाला कमी क्षमतेची विज पुरवठा होईल अशी व्यवस्था करण्याची धमकी दिल्याबाबतची लेखी तक्रार दिनांक २६/०३/२०२५ रोजी ला.प्र.वि, पालघर यांचेकडे केली.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/०३/२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री. राजेश चंद्रकांत मोरे, वायरमन नव्याने १०० KVA व्हॉलटेज क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आल्यामुळे तक्रारदार यांचा फायदा होणार असल्याने त्याचे मोबदल्यात तक्रारदार यांचेकडे रू. ३०,०००/— लाचेची रक्कमेची मागणी केल्याचे केल्याचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे लागलीच करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान नमुद लोकसेवक यांनी ३०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले, म्हणुन पालघर पोलीस ठाणे, जि.पालघर येथे गु.र.क्र. १००/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारीत २०१८) चे कलम ७ अन्वये दिनांक २७/०३/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**मार्गदर्शक अधिकारी— मा. श्री.शिवराज पाटील सो, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**
**मा. श्री.सुहास शिंदे सो, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**
**मा. श्री.संजय गोविलकर सो, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

**संपर्क पत्ता :—** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कार्यालय कक्ष क्र. १०८,
प्रशासकीय इमारत—'ब', जिल्हा मुख्यालय,पालघर—बोईसर रोड, कोळगाव,
ता.जि. पालघर. पिनकोड— ४०१४०४.
संकेतस्थळः— https://www.acbmaharashtra.gov.in/
ई—मेल :— dyspacbpalghar-mum@mahapolice.gov.in
टोलफ्रीनं. :— 1064
दुरध्वनीक्रमांक :— 02525-297297

**(हर्षल चव्हाण)**
**पोलीस उपअधिक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पालघर**